# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा.क्र. तंशिविकापु/विवि/२०१८-१९/ ४००४ दिनांक :- 04 SEP 2018

परिपत्रक

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक,**
**या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,**

विषय :- आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्याकडून प्रवेशाच्या वेळी १०० टक्के शिक्षण शुल्क घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी तात्काळ विद्यार्थ्यास परत करणेबाबत.

संदर्भ :-१. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र ईबीसी-२०१८/प्र.क्र ३८/तांशि-४ दिनांक १२/०९/२०१८
२. विभागीय आयुक्त सामान्य प्रशासन पुणे विभाग पुणे यांचे पत्र क्र कार्या १/सा.प्र १/आरआर/१९२६/१८ दिनांक २८/०८/२०१८

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र २ नुसार मराठा क्रांती मूक मोर्चा यांनी दिनांक २०/०८/२०१८ रोजी विभागीय आयुक्त कार्यालया पुणे येथे बेमुदत चक्री उपोषण सुरु केले होते. त्या अनुषंगाने दिनांक २७/०८/२०१८ रोजी मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांच्या अध्यक्षतेखली विभागीय आयुक्त कार्यालय,पुणे येथे आढावा बैठक संपन्न झालेली असून, सदर बैठकीमध्ये मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांनी दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करणेत यावी.

**फी सवलत :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज फी प्रतिपूर्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेची अंमलबजावणी :-**

१. " शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रकियेद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती अनुज्ञेय असल्याने , **विद्यार्थ्याकडून प्रवेशाच्यावेळी १०० टक्के शिक्षण शुल्काची रक्कम संस्थांनी घेतली असल्यास ५० टक्के शिक्षण शुल्काची रक्कम तात्काळ विद्यार्थ्यास परत करण्यात यावी**."
२. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज फी प्रतिपूर्ती योजना / डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना** या दोन्ही योजनांबाबत सर्व शासन निर्णयांच्या प्रतींना व्यापक प्रसिध्दी दयावी.
३. प्रत्येक महाविद्यालयाने फी बाबत शासनाकडील अनुदानाच्या माहितीची प्रसिध्दी वेब साईटवर करावी. तसेच महाविद्यालयाचे दर्शनी भागात याबाबत फलक लावावा.

डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ सर्व पात्र विद्यार्थ्यांना होईल, याची दक्षता घ्यावी. या योजनेची बॅनर्स, पोस्टर्स, वेब-साईट,इत्यादी माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

या बाबत शासन स्तरावरुन तसेच मा.आयुक्त पुणे विभाग पुणे व जिल्हाधिकारी पूणे यांचेकडून सतत पाठपुरावा होत आहे. तरी आपण शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी १००% शिक्षण शुल्क घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी तात्काळ विद्यार्थ्यास परत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन शुध्दिपत्रक क्र.ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४**
**मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.**
**दिनांक : १२ सप्टेंबर, २०१८**

वाचा :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.ईबीसी-२०१८/ प्र.क्र.३८/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०१८

**शासन शुध्दिपत्रक :**

संदर्भाधिन दिनांक ६ सप्टेंबर,२०१८ च्या परिपत्रकातील परिच्छेद-१ पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा. -

**"शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती अनुज्ञेय असल्याने, विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी १०० टक्के शिक्षण शुल्काची रक्कम संस्थांनी घेतली असल्यास ५० टक्के शिक्षण शुल्काची रक्कम तात्काळ विद्यार्थ्यास परत करण्यात यावी."**

३. सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०९१२१५०६५७६००८ आहे. हे शुध्दिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.09.12 15:54:55 +05'30'

**( संजय औ.धारुरकर)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
३. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

विभागीय आयुक्त कार्यालय
(सामान्य प्रशासन विभाग) विधान भवन, पुणे-१.
फोन क्र. ०२०-२६३६१०६८ फॅक्स क्र.०२०-२६३४३२३३

महत्वाचे/तात्काळ

कार्या.१/सा.प्र.१/आरआर/ १६२६/१८
दि.२८/ ०८ /२०१८

प्रति,

सह संचालक,
तंत्र शिक्षण, पुणे विभाग, पुणे

**विषय :-** मराठा क्रांती (मूक) मोर्चा यांचे मागण्यांबाबत दि.२७/०८/२०१८ रोजी मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीबाबत

उपरोक्त विषयाबाबत कळविणेत येते की, मराठा क्रांती (मूक) मोर्चा यांचे मागण्यांबाबत विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे दि. २०/०८/२०१८ पासून बेमुदत चक्री उपोषण सुरु होते. त्या अनुषंगाने दि. २७/०८/२०१८ रोजी मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे बैठक संपन्न झालेली असून, सदर बैठकीमध्ये मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी दिलेल्या सूचनांनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. :-

**फी सवलत :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज फी प्रतिपूर्ती योजना व डॉ. पंजावराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेची अंमलबजावणी :-**

आपले जिल्हयातील सर्व विदयालये व सर्व महाविदयालयांना सदर योजनेची काटेकोर अंमलबजावणी करणेच्या सूचना देण्यात याव्यात व ज्या विदयार्थ्यांकडून ५०% फी घेणे आवश्यक असताना, १०० % फी घेण्यात आली आहे, त्यांची ५०% फी परत करणेच्या सूचना संबंधित विदयालये व महाविदयालयांना देण्यात याव्यात.

१) १) राजर्षी छात्रपती शाहू महाराज फी प्रतिपूर्ती योजना
   २) डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना

वरील दोन्ही योजनांबाबत सर्व शासन निर्णयांच्या प्रतींना व्यापक प्रसिध्दी दयावी.तसेच सर्व महाविद्यालयांच्या दर्शनी भागात याबाबत फलक लावणेत यावेत.

२) नोडल अधिकारी मार्फत शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन सदर योजनेची काटेकोर अंमलबजावणी करावी.
३) याअनुषंगाने जिल्हास्तरावर आपले यंत्रणेकडून होणा-या कार्यवाहीबाबत पाठपुरावा करुन पूर्तता अहवाल या कार्यालयास दि. १० सप्टेंबर, २०१८ पर्यंत सादर करणेत यावा.
४) प्रत्येक महाविदयालयास फी बाबत दिलेले शासनाकडील अनुदानाच्या माहितीची प्रसिध्दी वेब साईटवर करावी. तसेच महाविद्यालयाचे दर्शनी भागात याबाबत फलक लावावा.

तसेच डॉ. पंजावराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ सर्व पात्र विदयार्थ्यांना होईल, याची दक्षता घ्यावी. यासाठी संबंधित यंत्रणेमार्फत योजनेची बॅनर्स, पोस्टर्स, वेब-साईट, इत्यादी माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देण्यात आलेली आहे याबाबत आपलेस्तरावरुन खातरजमा करणेत यावी.

तसेच वर नमूद दोन्ही योजनांची किती माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविदयालयांत अंमलबजावणी होते हे तपासून याबाबतचा केलल्या कार्यवाहीची आकडेवारी व सविस्तर खुलाशासह अहवाल या कार्यालयास दि. १० सप्टेंबर, २०१८ पर्यंत सादर करावा.

याबाबत शासन स्तरावरुन तसेच मराठा क्रांती मोर्चा आंदोलनकर्ते यांचेकडून पाठपुरावा होत आहे. तरी आपण शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणेची दक्षता घ्यावी.

(संजयसिंह चव्हाण)
उपायुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे विभाग, पुणे

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
11 SEP 2018
क्र. 8341